साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028

✽ परळी वैजनाथ ✽ रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६ ✽ पाने-४ ✽ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

## श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवाला सुरुवात

### मंगळवारी भक्तीगीत गायन, पालखी मिरवणूक

**परळी वैजनाथ, (बातमीदार):- देशभरातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भावीकांत ओळख असलेल्या येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या महाशिवरात्रीनिमित्त रविवार (ता.१५) पासून भरणाऱ्या वार्षिक यात्रा महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून या उत्सवात सहभागी होण्यासाठी भाविक येथे दाखल झाले आहेत. यात्रेच्या निमित्ताने येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

१८ फेब्रुवारीपर्यंत हा यात्रा महोत्सव चालणार आहे. यात्रा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात शंभरावर सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावण्यात आले आहेत. या कॅमेऱ्याद्वारे संपूर्ण यात्रेवर लक्ष ठेवण्यात येत आहे. शिवाय चोख पोलिस बंदोबस्त यावेळी असणार आहे.

महाशिवरात्रीनिमित्त शनिवारी (ता.१४) मध्यरात्रीच 'श्री' ची महापूजा होवून सर्वसामान्य भाविकांसाठी वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनास सुरवात होणार आहे. स्त्री-पुरूष भावीकांसाठी वेगवेगळ्या दर्शन रांगा मंदिरात असणार आहेत. या शिवाय शंभर रूपये देणगी देवूनही विशेष दर्शन पासची व्यवस्था वैद्यनाथ देवस्थान संस्थेने केली आहे. पास विक्री मंदिर पायथ्याला शनी मंदिराजवळ तसेच उत्तरघाटावरील प्रवेशद्वाराजवळ असणार



आहे. रविवारी (ता.१५) सायंकाळी बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची शासकीय महापूजा करण्यात येणार आहे. त्यानंतर सर्वसामान्य भाविकांना अभिषेक करता येईल. यासाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था देवस्थान संस्थेने यंदा केली आहे.

महाशिवरात्रीदिनी रात्री १० च्या नंतर मंदिर बंद होईपर्यंत परळी शहर व परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना तसेच माजी सैनिकांना आपले ओळखपत्र दाखवून दर्शन पासच्या रांगेतून विनामूल्य दर्शनाची सोय करण्यात आली आहे. याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन देवस्थान संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

सोमवारी (ता.१६) मंदिरात इतर धार्मिक कार्यक्रम होणार तर मंगळवारी (ता.१७) सायंकाळी पारंपारीक पध्दतीने वाजतगाजत वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या पालखीची मिरवणूक शहरातून निघणार आहे. ही पालखी देशमुखपार परिसरात आल्यानंतर गायीका मंजुषा पाटील (पुणे) यांच्या भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमानंतर रात्री नऊच्या सुमारास शहरातील अंबेवेस भागातील सरस्वती नदी परिसरात शोभेची दारूही उडवण्यात येणार आहे. पालखी मार्गावरील नांदूवेस, गणेशपार, गोपनपाळे गल्ली भागात स्थानिक कलावंतांचा भजन व भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम पालखीपुढे होणार आहे. या पालखी मिरवणुकीनंतर बुधवारी (ता.१८) बिदागी व प्रसाद असे कार्यक्रम होणार आहेत. त्यानंतर चार दिवस चालणाऱ्या या यात्रा महोत्सवाची सांगता होणार आहे.

दरम्यान, या यात्रा उत्सवाची तयारी वैद्यनाथ मंदिरात पूर्ण झाली आहे. यानिमित्ताने रंगरंगोटी, साफसफाई, दर्शन रांगांची व्यवस्था, विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रंगीबेरंगी विद्युत रोषणाईमुळे मंदिर परिसर दिव्यांनी उजळून निघाला आहे. महाशिवरात्रीदिनी दर्शनासाठी दर्शन रांगेत उभ्या राहणाऱ्या भाविकांना उन्हाचा त्रास होवू नये म्हणून कापडी मंडप दर्शन रांगेच्या मार्गावर टाकण्यात आला आहे. भाविकांसाठी दर्शन रांगेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही केली गेली आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भावीकांची गैरसोय होवू नये, त्यांना सुलभ, लवकर दर्शन घेता यावे यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. देवस्थान संस्थेचे सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख, त्यांचे सहकारी सर्व विश्वस्त, स्थानिक पोलिस अधिकारी व त्यांचे सर्व सहकारी यात्रा उत्सवाच्या तयारीसाठी परिश्रम घेत आहेत.

**सोमेश्वर शिवलिंगाच्या पालखीची मिरवणूक :-** महाशिवरात्री यात्रेनिमित्त परळी शहरातील संत जगमित्र नागा मंदिर, सोपान काका मंदिर, सुर्वेश्वर मंदिर, परिसरातील जिरेवाडी येथील सोमेश्वर, नागापूर येथील श्री नागनाथ, टोकवाडी येथील रत्नेश्वर, तपोवन येथील तपेश्वर, धर्मापूरी येथील मल्लिकार्जून केदारेश्वर, बेलंबा, नाथरा, गाढेपिंपळगाव येथीलही शिवमंदिरासह शहरातील इतर देव-देवतांच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिरेवाडी येथील सोमेश्वर या शिवलिंगाच्या पालखीची मिरवणूक पारंपारीक पध्दतीने रविवारी (ता.१५) शहरातून निघणार आहे. याशिवाय संत जगमित्र नागा, संत सोपानकाका यांच्या पालखी, दिंड्यांची मिरवणूकही निघणार आहे. शहरातील विविध सामाजिक संस्था, व्यापारी, विविध संघटनांच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त मंदिर परिसरात भाविकांसाठी फराळ, पिण्याचे पाण्याचे स्टॉल लावण्यात आले आहेत. येथील बस आगारातून जादा बसही यानिमित्ताने सोडण्यात आल्या आहेत. ✽✽✽

## पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### 'महा पशुधन एक्स्पो'२०२६ ला मुख्यमंत्र्यांची भेट; मंत्री पंकजा मुंडेंची 'उद्योजक' योजनेची घोषणा

**बीड/परळी वैजनाथ (जिमाका):- ''आमची माय आणि आमची माती हेच आमचे खरे प्रेम आहे. ज्याप्रमाणे शिवशंभूंच्या दर्शनापूर्वी नंदीला वंदन करण्याची आपली संस्कृती आहे, त्याच धर्तीवर पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करत आहोत. तंत्रज्ञानाच्या जोडणीतून हे क्षेत्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावर दुग्ध उत्पादनात अग्रेसर करेल,'' असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

परळीतील अंबेजोगाई रस्ता लगत असलेल्या ओपळे मैदानावर पशुसंवर्धन विभाग आयोजित तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पोच्या पाहणीनंतर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याप्रसंगी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार रत्नाकर गुट्टे, पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन, आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठम कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ.





शीतलकुमार मुकणे, खासगी सचिव मंदार वैद्य, अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पशुसंवर्धन विभागाचे सह आयुक्त, बहुसंख्येने पशुपालक उपस्थित होते.

**शेतीला 'क्लायमेट रिस्क' मधून वाचवणार-** मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ''हे प्रदर्शन केवळ एक सोहळा नसून कोरडवाहू शेतीतील हवामान जोखीम (उश्र्ळारींश ठळीज्ञ) कमी करण्यासाठी उचललेले एक धोरणात्मक पाऊल आहे. पिकांचे नुकसान झाले तर पशुधन हेच शेतकऱ्यासाठी आधार म्हणून काम करते. त्यामुळेच आम्ही गाईला केवळ धार्मिक महत्त्व न देता तिचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन 'राज्यमाता' दर्जा दिला आहे.''

**तंत्रज्ञानाची कास: अख आणि एम्ब्रियो ट्रान्सप्लांट-** दुग्ध व्यवसायातील तफावत मांडताना मुख्यमंत्री म्हणाले, ''पंजाबमध्ये गाय १०-१५ लिटर दूध देते, तर आपल्याकडे २.५ लिटर ही तफावत भरून काढण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. पशुधन संवर्धन, आरोग्य व अचूक निरीक्षण आणि उत्पादकता वाढविण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अख) मिशन' चा वापर करण्यात येईल. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट आणि सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाच्या कालवडींची पैदास वाढवून दुग्धोत्पादन वाढवले जाईल. यासाठी विदर्भ- मराठवाड्यात 'मदर्स डेअरी' सोबत करार देखील करण्यात आला आहे.

**अफवांवर विश्वास नको-** ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्राला जागतिक स्पर्धेपासून सुरक्षित ठेवले आहे. भारत-अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे बाहेरील माल येऊन भाव पडतील, या अफवांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये,'' असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याउलट भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेची मोठी बाजारपेठ आता खुली झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**गावातला तरुण होईल 'पशुधन उद्योजक': पंकजा मुंडे**

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, ''केवळ नोकरीच्या मागे न लागता गावातील तरुणांनी मालक बनावे, यासाठी आम्ही लवकरच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' आणत आहोत. महिलांना लखपती दीदी बनवण्यासाठी शासनाकडून शून्य टक्के व्याजावर कर्ज उपलब्ध करून देत आहे.'' तसेच पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. हा दर्जा दिल्याबद्दल मुख्यमंत्री महोदयांचे मंत्री मुंडे यांनी आभार मानले.

माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनीही परळीच्या विकासासाठी मुख्यमंत्री महोदय यांच्या समोर मागण्या मांडल्या. तसेच बीड व परळीचे विकासासाठी कायम निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री यांचे आभार मानले.

**विजेत्यांचा गौरव-** अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी पालन योजनेतील विजेत्यांना आणि गोपाळ रत्न पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते पशुसंवर्धन विभागाच्या 'महापशुधन वार्ता' या मासिकाच्या १०व्या अंकाचे प्रकाशन व विभागाच्या 'दिनदर्शिका २०२६'चे अनावरण केले.

(उर्वरित पान २ वर)

# परळीच्या प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचा महाशिवरात्र उत्सव






शिवप्रभूला दरमहिन्यातील चतुर्दशी प्रिय आहे. त्यात महाशिवरात्री अतिप्रिय आहे. माघ महिन्यात कृष्ण पक्षात चतुर्दशीला महाशिवरात्र असते. शिवपुराण, गरूडपुराण, पद्मपुराण, स्कंदपुराण, अग्निपुराणात शिवरात्रीच्या पावन पर्वाचा महिमा सांगितलेला आहे. या दिवशी शंकराच्या पिंडीला एक किंवा ११ बिल्वपत्र अर्पण करण्याचे महत्व आहे. गंध, पुष्प, धूप, दीप व नेवैद्य दाखवतात शिवाय यादिवशी उपवास, पूजाअर्चा करण्याचेही महत्त्व आहे. शिवरात्र म्हणजे शिव आणि शक्तीच्या मिलनाचे महापर्व होय. असे काही भाविक सांगतात. आद्दिदेव भगवान शंकर कोट्यवधी सूर्याच्या तेजा इतक्या महातेजस्वी लिंगाच्या स्वरुपात प्रकट झाले असे सांगतात तर शिवपुराणात शंकराच्या निराकार स्वरूपाचे प्रतीक असणारे लिंग याच तिथीला प्रकट झाले आणि सर्व प्रथम ब्रम्हा आणि विष्णू यांनी त्यांची पूजा केली. त्यामुळे ही तिथी शिवरात्र म्हणून प्रसिद्ध झाली.

महाशिवरात्रीला केलेल्या शिवपूजेने वर्षभर शिवपूजा केल्याचे फळ मिळते, अशी मान्यता आहे. शंकराच्या आराधनेसाठी केल्या जाणाऱ्या सर्व व्रतवैकल्यांमध्ये महाशिवरात्रीचे स्थान सर्वोच्च आहे. यासारखे दुसरे व्रत नाही. या दिवशी भगवान शंकर सर्व शिवलिंगामध्ये संचार करतात म्हणून या दिवसाचे महत्त्व आहे. म्हणून कोणत्याही शिवालयात जाऊन शिवरात्रीला महादेवाची पूजाअर्चा करावी. हा दिवस पृथ्वीच्या उत्पत्तीचा, शिवपार्वती विवाहाचा मानला जातो. हरिणांना मृगनक्षत्र व पारध्यांना व्याघ्र नक्षत्र म्हणून आकाशात स्थान मिळाले तो दिवस शिवरात्रीचा.

देशभरातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ख्याती असलेल्या परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) येथील प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचा महाशिवरात्रीला मोठा उत्सव असतो. पाच दिवस चालणाऱ्या या उत्सवाची तयारी कितीतरी दिवस अगोदर मंदिरात सुरू असते. मंदिराची रंगरंगोटी, साफसफाई केली जाते. महाशिवरात्रीला भरणाऱ्या वार्षिक यात्रा उत्सवात लाखो भाविक 'श्री' चे दर्शन घेतात. महाशिवरात्रीदिनी भल्या पहाटे श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची नित्यपूजा होवून सर्वसामान्य भाविकांसाठी खुले होते. भल्या पहाटेपासून दूरपर्यंत दर्शनासाठी शिवभक्तांच्या रांगा लागलेल्या असतात. परगावाहून येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय असते. यावेळी शिवनामाचा जयघोष केला जातो. 'हर हर महादेव, श्री वैद्यनाथ महाराज की जय!' या जयघोषाने मंदिर परिसर दणाणून जातो. यादिवशी मंदिरात दीपमाळेवरील प्रांगणात दिवसभर सनई, चौघड्याचा मंजूळ स्वर निनादत असतो. शिवाय विविध अगरबत्ती उत्पादक कंपन्यांकडून दरवर्षी महाअगरबत्ती येथे लावली जाते. ही अगरबत्ती दिवसभर चालते. या अगरबत्तीच्या दरवळणाऱ्या सुगंधामुळे मंदिर परिसरातील वातावरण प्रसन्न होते. यांसह मंदिरात यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दरम्यान, मंदिरावर विद्युत रोषणाई केली जाते. यामुळे मंदिर परिसर दिव्यांनी उजळून जातो. महाशिवरात्रीला सुमारे तीस तासापर्यंत दर्शन चालते. या दिवशी सायंकाळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते श्री वैजनाथाची शासकीय रुद्राभिषेक पूजाही केली जाते. त्यानंतरच सर्वसामान्य भाविकांकडून महाशिवरात्रीला अभिषेक पूजा केली जाते. शेकडो महिला भाविक या दिवशी मंदिर परिसरात 'शिवरात्रवात' पाजळतात. ही येथे जुनी प्रथा आहे. परळी परिसरातील जिरेवाडी येथील शिव श्री सोमेश्वराची पालखी वाजतगाजत महाशिवरात्रीला श्री वैद्यनाथाच्या म्हणजे आपल्या भावाच्या भेटीला मंदिरात येते. हजारो भाविक यावेळी उपस्थित असतात. या शिवाय शहरातील संत जगमित्रनागा व सोपानकाका यांच्या दिंड्याही या दिवशी वैद्यनाथाच्या दरबारी येतात. येथे शेकडो वर्षांची ही परंपरा आहे. शिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी



वैद्यनाथ मंदिरात भजन, कीर्तन, प्रसाद वाटपाचा कार्यक्रम होतो तर तिसऱ्या दिवशी श्री वैजनाथ ज्योतिर्लिंगाची पारंपरिक पद्धतीने शहरातून पालखी मिरवणूक निघते. पालखी मिरवणुकीला सुरूवात होण्यापूर्वी दक्षिणमुखी श्री गणेशाची पूजा होते. पालखी गावातील देशमुखपारावर आल्यानंतर तिथे भक्तिगीत गायनाचा कार्यक्रम होतो. त्यानंतर सरस्वती नदीत शोभेची दारू उडवली जाते. नांदूरवेस, गणेशपार भागात पालखीपुढे कलावंतांच्या हजेरीचा कार्यक्रम होतो. यावेळी स्थानिक कलावंत संगीत रचना सादर करतात. गावभर पालखी मिरवून सायंकाळी उशिरा मंदिरात परतते. शहरात पालखी मार्गावर भाविकांकडून सडा टाकला जातो, रांगोळी काढली जाते. शेकडो भाविक यावेळी पालखीचे दर्शन घेतात. पूजा करतात. देव आपल्या दारी आल्याचा मोठा आनंद यावेळी परळीकरांना होतो. या पालखी मिरवणुकीने यात्रा उत्सवाची सांगता होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंदिरात महाशिवरात्र व पालखीवेळी सेवा करणाऱ्या सेवेकऱ्यांना देवस्थान संस्थेतर्फे बिदागी देण्याचा व महाप्रसादाचा कार्यक्रम होतो.

महाशिवरात्रीला लाखो भाविक परळीत दर्शनाला येतात. भाविकांच्या सोयीसाठी परळी पालिका, देवस्थान संस्थान विविध उपक्रम राबवते. त्याच बरोबर शहरातील विविध सामाजिक संस्था, व्यापारी, उद्योजक, सर्वसामान्य नागरिकही भाविकांसाठी मोफत फराळ वाटतात. जागोजागी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाते. मदत केंद्रही चालवले जाते. लाखो भाविक या सेवेचा लाभ घेतात. या महोत्सवात मोठा जनसागर उसळत असल्याने सबंध परळी शहर शिवभक्तीमय होते. परळीचा असा हा महाशिवरात्री उत्सव शिवभक्तांच्या दृष्टीने महत्वाचा व तेवढाच मोठा आहे.

**– लक्ष्मण वाकडे, पत्रकार,**
परळी वैजनाथ.

# परळीत सीटू कामगारांचा तहसील कार्यालयावर धडकला मोर्चा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- चार श्रमसंहिता रद्द करा यासह अन्य कामगार क्षेत्रातील विविध मागण्यांसाठी गुरूवारी (दि.१२) परळी तहसील कार्यालयावर सिटू कामगारांचा भव्य दिव्य मोर्चा धडकला. कामगार विरोधी धोरण रद्द करा, खाजगीकरण रद्द करा, चार श्रम संहिता रद्द करा अशा प्रकारची मागणी सिटू कामगार मोर्चेकर्यांनी शासनाकडे केली.

केंद्र सरकारने कामगार विरोधी भांडवलदार धार्जिन्या चार श्रमसंहिता लागू केलेल्या आहेत. कामगार विरोधी चार श्रमसंहिता रद्द करा या प्रमुख मागणीसाठी परळी सिटू कामगार संघटनेने परळी




तहसीलवर मोर्चा काढला होता. परळीतील सिटू कार्यालयापासून हा मोर्चा टावर- मोंढा- बस स्टॅन्ड मार्गे तहसीलवर पोहोचला. चार श्रमसंहिता रद्द करा, आशा वर्कर्सना कायम करा, शालेय पोषण आहार कामगारांना कायम करा, आजी-आजोबांना दहा हजार रुपये पेन्शन द्या, कंत्राटीकरण थांबवा, खाजगी धंद्यात आरक्षण लागू करा, घर कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती द्या, घर कामगारांना दहा हजार रुपये पेन्शन द्या, शालेय पोषण आहार कामगारांना किमान वेतन तीस हजार रुपये द्या आदी घोषणांनी परळी शहर कामगारांनी दणाणून सोडले. मोर्चा तहसीलवर धडकल्यानंतर या ठिकाणी पांडुरंग राठोड, कॉ. पी.एस. घाडगे, कॉ. प्रभाकर नागरगोजे, बांधकाम कामगार नेते प्रकाश वाघमारे, शेख जावेद, नवीद मौजन यांनी उपस्थित कामगारांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे बीड जिल्हा सिटू चे अध्यक्ष प्रा. बी.जी. खाडे यांनी कामगारांना सविस्तर मार्गदर्शन केले व शासनाचे धोरण कामगार विरोधी असून सातत्याने लढा लढला पाहिजे असे आवाहन केले. यावेळी कॉ. किरण सावजी, सुवर्णा रेवले, अशा लांडगे, हेमा काळे, शेख जावेद, रमेश पांचाळ, यमुना पाथरकर यांच्या शिष्टमंडळाने तहसीलच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले. मोर्चा यशस्वी करण्यासाठी जालिंदर गिरी, आशा लांडगे, अनिता गिराम, शेख फिरोज, बाबासाहेब रोडे, संजय कसबे, संदेश सरवदे, मीरा ताटे, रमेश पांचाळ, प्रकाश चव्हाण, परमेश्वर गीते, अरुण पांचाळ आदींनी मेहनत घेतली. ***



**✻ सुविचार ✻**

धनवान' होण्यासाठी, एक-एक कणाचा 'संग्रह' करावा लागतो ! आणि 'गुणवान' होण्यासाठी, एक-एक क्षणाचा 'सदुपयोग' करावा लागतो !

संपादकीय...

# ताई, भैय्या हा भेदभाव का?


परळीच्या भूमीकन्या व राज्याच्या पर्यावरण, पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने परळी येथील श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या महाशिवरात्रीनिमित्त भरत असलेल्या वार्षिक यात्रा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परळी शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील मैदानावर राज्य म्हणा की राष्ट्रीय पातळीवरील 'महा पशुधन एक्सपो' या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. परळीसह बीड जिल्ह्यातील तसेच इतर शेजारील जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर व पशुधन मालकांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रशासकीय पातळीवर या प्रदर्शनाची जोरदार तयारी सुरू होती. परळीत भरणारे व एवढे मोठे हे पहिलेच प्रदर्शन आहे. हे प्रदर्शन भव्य दिव्य व्हावे, ते शेतकरी, पशुधन मालकांसाठी उपयुक्त ठरावे आणि ते यशस्वी व्हावे म्हणून खुद्द मंत्री पंकजाताई प्रयत्न करत होत्या. या प्रदर्शनात राज्यातील नामवंत विविध जातींच्या पशुंचा समावेश आहेच, शिवाय राज्याबाहेरील गुणवंत व दर्जेदार पशुधन या प्रदर्शनात आहेत. पशुधन मालकांना पशुधनाच्या नवनवीन बाबींची तसेच या क्षेत्रात झालेल्या बदलाची माहिती व्हावी, नव्या गोष्टींचा लाभ व्हावा. या शिवाय उत्पादन, बाजारपेठ, खाद्यपदार्थ, शासकीय योजना, अनुदान या सगळ्या गोष्टींचीही माहिती व्हावी, यातून त्यांची प्रगती व्हावी, म्हणून हे प्रदर्शन परळीत भरवले गेले आहे.

एवढे मोठे प्रदर्शन राज्य सरकारच्या वतीने परळीत भरवले गेले. या प्रदर्शनावर लाखो नव्हे तर कोटी रूपये खर्च केले गेले. या प्रदर्शनात राज्यभरातून शेतकरी, पशुधन मालक व या क्षेत्रातील संबंधीत सहभागी व्हावेत म्हणून प्रसारमाध्यमातून बातम्या, जाहिराती दिल्या गेल्या. यामुळे राज्यभरातील जनतेचे या प्रदर्शनाकडे लक्ष वळले. हे प्रदर्शन परळीत होत आहे, ही बाब परळीकरांसाठी अभिमानाची व गौरवास्पद आहे. यामुळे परळीच्या महाशिवरात्रीच्या उत्सवात आनंदाची भर पडली. या प्रदर्शनाच्या तयारीपासून त्याचे उद्घाटन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट तसेच प्रदर्शनातील विविध बाबींची माहिती आपल्या वर्तमानपत्रातून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम इथल्या पत्रकारांनी मोठ्या प्रमाणात केले. परंतु खंत याची की या प्रदर्शनाचे साधे निमंत्रणही परळीत अनेक पत्रकारांना नाही. सरकारी पैशांतून प्रदर्शनाच्या दिलेल्या जाहिराती अनेक वृत्तपत्रांना दिल्या नाहीत. राज्य, विभाग, जिल्हा सोडा. ज्या गावात हे प्रदर्शन होत आहे. त्या गावातील सर्व वर्तमानपत्रांना छोट्या मोठ्या जाहिराती दिल्या असत्या तर राज्य सरकारचे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले नसते. उलट पत्रकारांना, संपादकांना आनंदच झाला असता. तोंड बघून व ठराविक वृत्तपत्रांनाच त्याही सरकारच्या पैशातून जाहिराती देण्याच्या संबंधितांच्या भूमिकेबाबत अनेक पत्रकार, संपादक परळीत नाराज झाले. बातम्या, जाहिराती देताना अलिकडच्या काळात मंत्री पंकजाताई यांच्या परळीतील कार्यालयाकडून परळीतील पत्रकार व संपादकांबाबत भेदभाव केला जात आहे. यामुळे पत्रकार, संपादक दुरावत चालले आहेत, ते मोठे नाराज होत आहेत. कार्यकर्ते, माणसे जोडण्याचे काम पुढाऱ्यांचे. पण इथे ते तोडण्याचे काम चालले आहे. हा प्रकार असाच वाढत गेला तर ही बाब ताईंसाठी मोठी नुकसानकारक ठरू शकणारी आहे.

पशुधन प्रदर्शनाप्रमाणेच परळी पालिकेमार्फत गेल्या अनेक वर्षापासून कासवगतीने सुरू असलेल्या व दीर्घकाळ काम बंद असलेल्या डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन या दरम्यान केले गेले. या उद्घाटनाचेही निमंत्रण अनेक पत्रकारांना नाही. या कार्यक्रमाच्या जाहिरातीही ठराविक वर्तमानपत्रांनाच दिल्या गेल्या. नगर पालिकेच्या पैशातून दिलेल्या जाहिरातीत हा भेदभाव का? हा प्रश्न परळीतील पत्रकार व संपादकांपुढे आहे. ताई, भैय्या असा भेदभाव करू नका. असे करणाऱ्या आपल्या संबंधितांना वेळीच आवरा व सांगा, एवढेच आपणास आमचे आवाहन आहे. ✻✻✻

# वैद्यनाथ नगरीत लोकर्पित होत आहे नूतन ज्ञानमंदिर!





भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग नगरीत ज्ञानाचा नवा अध्याय सुरू होत आहे. परळीच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेत मोलाची भर घालणाऱ्या डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या अत्याधुनिक नूतन वास्तूचे लोकार्पण होत आहे. या सोहळ्याचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत. या भव्य वास्तूचे लोकार्पण महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते होत आहे, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी वैजनाथ नगर परिषद काम करत आहे. नगर परिषद परळी वैजनाथच्या वतीने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प 'वैशिष्ट्यपूर्ण योजना' आणि 'नगरोत्थान विकास योजना (न.वि. ६)' यांच्या संयुक्त माध्यमातून साकारण्यात आला आहे. सुमारे ५ कोटी १२ लाख रुपयांच्या खर्चातून डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालय नवनिर्माण झाले आहे. या सुसज्ज ज्ञानमंदिरात प्रशस्त वाचन कक्ष, डिजिटल लायब्ररी, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका, बालवाचन विभाग, कॉन्फरन्स हॉल, दिव्यांग स्नेही सुविधा तसेच भविष्यात बुद्धिबळ प्रशिक्षण केंद्र आणि एआय लॅब विकसित होणार आहेत. हे वाचनालय केवळ पुस्तकांचे केंद्र न राहता विचारांचे, संस्कृतीचे आणि नव्या पिढीच्या घडणीचे केंद्र ठरणार आहे. डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाकडे सध्या ४० हजारांहून अधिक पुस्तकांची समृद्ध ग्रंथसंपदा उपलब्ध असून, नव्या इमारतीमुळे ही संख्या एक लाखांपर्यंत नेण्याचा संकल्प आहे. डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाची ही नूतन वास्तू म्हणजे परळी वैजनाथ शहराच्या शैक्षणिक प्रगतीचा मैलाचा दगड ठरणार आहे. वाचन संस्कृती जपण्याबरोबरच विचाराच्या कक्षा रुंदावण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक ती सर्व दालने एकाच ठिकाणी उभे करण्याचा प्रयत्न आहे. शहराच्या सर्वांगीण जडणघडणीत महत्त्वाचा पैलू असलेल्या ज्ञानवृद्धीच्या अनुषंगाने हे वाचनालय अधिकाधिक समृद्ध आणि एक ज्ञानतीर्थ बनेल असा विश्वास आहे.या ऐतिहासिक क्षणाचे आपण सर्वा साक्षीदार होवूया. धन्यवाद!

**– बाजीराव धर्माधिकारी**
नगरसेवक, परळी वै.

(पान १ वरुन)............ **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी 'महापशुधन एक्स्पो २०२६'मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पात्र महिला बचत गटांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्ज वितरण केले. जिरेवाडी, ता. परळी येथील तुळजाई महिला स्वयंसहायता समूहास १५,००,००० इतक्या कर्जाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)च्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत बर्दापूर येथील 'उमेद सखी महिला शेतकरी उत्पादक कंपनी'ला शासन अनुदानाच्या १२,२७,५०० या प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले.

**सामंजस्य कराराचे प्रतिकात्मक हस्तांतरण–** विदर्भ मराठवाडा दुग्धोत्पादन प्रकल्प आणि पशुधन विकास महामंडळ नागपूर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे प्रतिकात्मक हस्तांतरण यावेळी करण्यात आले. पशुधन विकास मंडळ नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी शितल मुकणे आणि मुख्य शास्त्रज्ञ महात्मा फुले कृषी विद्यापीठ सोमनाथ माने त्यासोबतच डॉ. दिनकर बोर्डे उपायुक्त पशुसंवर्धन जिल्हा परिषद सातारा व विदर्भ मराठवाडा उत्पादन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गोराडे यांना यावेळी मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते कराराच्या प्रति हस्तांतरित करण्यात आल्या.

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली, स्मृती दालनाचे उदघाटन–** मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रदर्शनामध्ये असलेल्या विविध पशुधनाची पाहणी केली. पाहणीत त्यांनी पशु पालकांचे कौतुक केले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार स्मृती दालनाचे उदघाटनही त्यांनी केले. मुख्य कार्यक्रम ठिकाणी सुरुवातीला राष्ट्रगीत, राज्यगीत झाल्यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. परळी नगर परिषदेच्या स्व. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाचे दूरदृष्य प्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले. केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय गोपाल रत्न २०२५ पुरस्कार घोषणा करण्यात आली असून राज्यातील दोन पशुपालकांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रगतीशील पशुपालक श्रीमती श्रद्धा ढवण यांची निवड झाली आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते श्रीमती ढवण सत्कार करण्यात आला. तसेच लाल कंधारी व देवणी गट पशु पालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सायली संजीव यांनी केले. आभार सचिव डॉ. एन. रामास्वामी यांनी मानले. या सोहळ्याला परळीतील नागरिक आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी अलोट गर्दी केली होती.

**मुख्यमंत्री यांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे :–** ✻ उदगीर प्रकल्प: उदगीरचे दूध भुकटी केंद्र १०० कोटी खर्चून पुन्हा सुरू करणार. ✻ नैसर्गिक शेती: रासायनिक खतांमुळे बिघडलेला जमिनीचा पोत सुधारण्यासाठी गोमूत्र व शेणापासून तयार होणाऱ्या 'जीवामृता'ला प्रोत्साहन. ✻आरोग्य सेवा: राज्यातील २८४१ पशु दवाखान्यांचे आधुनिकीकरण आणि फिरत्या पशु ॲम्ब्युलन्स सेवेचे जाळे. ✻ विकास दर: पशुसंवर्धन क्षेत्राचा विकास दर सध्याच्या ४-८% वरून २५% पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट. ✻ राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत महाराष्ट्रातील ३६६ प्रकल्पांना मंजुरी. ✻✻✻

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

✻ वर्ष ०९ ✻ अंक ४१ ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ ✻ किंमत : २ रू.

# ग्रामीण भागात उद्योजक घडावेत यासाठी पशु पालनाला कृषीचा दर्जा-पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

## ३८ एकर क्षेत्रात विविध स्टॉलची मांडणी; ३ दिवस चालणार पशुपक्षी प्रदर्शन

बीड, (जिमाका):- पशुपालनास कृषीचा दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे कृषी च्या दराने कर्ज पुरवठा करण्यासोबत पशु पालनासाठी ५० टक्के अनुदान देखील दिले जाणार आहे त्यामुळे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात ग्रामीण उद्योजक तयार होतील आणि यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन पशु संवर्धन तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी परळी येथील भव्य अशा महा पशुधन एक्सपो २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी केले.

परळी येथील अंबाजोगाई मार्गालगत असणा-या ओपळे मैदान येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. भव्य अशा ३८ एकर मैदानात होणारे हे प्रदर्शन १५ फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे. उद्घाटन प्रसंगी परळीचे आमदार धनंजय मुंडे, पशुसंवर्धन सचिव डॉ. एन. रामा स्वामी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पशुसंवर्धन आयुक्त प्रविण देवरे तसेच परळीच्या नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती. आरंभी प्रदर्शन स्थळी फित कापून व गौपूजन करुन सुरुवात झाली त्यानंतर औपचारिक उद्घाटन सोहळा दीप प्रज्वलन करुन पार पडला यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. छत्रपती शिवाजी



महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन तसेच स्व. गोपीनाथ मुंडे आणि स्व. अजित पवार यांना अभिवादन करण्यात आले. पशुपालन हा व्यवसाय उद्योगात रुपांतरीत व्हावा यासाठी शासन पुढाकार घेत आहे. या खात्याचा कार्यभार स्विकारल्यावर स्व. अजित पवार यांच्या पुढाकाराने बारामतीसोबत परळी येथील पशु महाविद्यालय आपण मंजूर करुन घेतले. आजचे हे भव्य प्रदर्शन पाहून स्व. अजित पवार आज असते तर त्यांनीही आयोजन आवडले असते असे पंकजा मुंडे म्हणाल्या. या प्रदर्शनासाठी देशातील विविध भागातील पशुधन येथे आणले आहे. या ठिकाणी देशातली सर्वात छोटी गाय तसेच विविध प्रजातींच्या गायी, बैल, घोडे आणि बकरे यांच्यासह विविध पक्षी विस्तीर्ण दालनांमध्ये ठेवण्यात आले आहेत. या ठिकाणी स्व. अजित पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ एक स्वतंत्र दालन देखल उभारण्यात आले आहे. पशुपालन तंत्रात आलेले नवे बदल तेसच उत्पादकता वाढवणारी आणि पशुंवर उपचार करणारी औषधे या ठिकाणी उपलब्ध आहेत. या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची मार्गदर्शपर व्याख्याने स्वतंत्रपणे होत आहेत. ***

# शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी भीमराव सिरसट यांची निवड



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील उर्जानगर वसाहतीतील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी औष्णिक वीज निर्मिती केंद्राचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भीमराव माणिकराव सिरसट यांची निवड झाली आहे.

उत्सव समितीच्या सदस्यांच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी अक्षय वीर, उपाध्यक्षपदी विजय जाधव, निलेश तोतवे, सचिवपदी तुषार पवार, सहसचिवपदी विजय मोरे, प्रदीप नेवगे, कोषाध्यक्षपदी कृष्णा नागटिळक, रंजित आचार्य तर संघटक म्हणून प्रवीण भंडे, ऋषीकेश देशमुख यांची निवड झाली. *

# अ.भा.माध्यमिक शिक्षक संघाच्या सहसचिवपदी राजकुमार कदम यांची निवड



बीड (बातमीदार):- मराठवाडा शिक्षक संघाचे अभ्यासू व लढाऊ सरचिटणीस राजकुमार कदम यांची अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाच्या राष्ट्रीय सहसचिव पदी निवड करण्यात आली आहे.

याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिलेली माहिती अशी की,अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाच्या राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक नुकतीच राजेस्थान येथील जयपूर शहरात पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात कार्यरत आसलेल्या मराठवाडा शिक्षक संघाला राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व देण्याचा निर्णय घेण्यात आला व अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाच्या सहसचिव पदी मराठवाडा शिक्षक संघाचे अभ्यासू ,लढाऊ व झुंझार असे सरचिटणीस राजकुमार कदम यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.सदरील निवड हि अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.इंद्रशेखर मिश्राजी (बिहार),कार्यकारी अध्यक्ष माजी शिक्षक आमदार नरसिम्हा रेड्डी(आंध्रप्रदेश),राष्ट्रीय सचिव सदानंद गौड (तेलंगणा) यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत करण्यात आली. यानिवडीमुळे आपल्या राज्यातील शिक्षकांचे व शिक्षण क्षेत्रातील केंद्रीय पातळीवरील प्रश्न केंद्रीय स्तरावर मांडण्यासाठी व मार्गी लावण्यासाठी राजकुमार कदम सर यांचासारखा खंदा प्रतिनिधी आपल्याला मिळाला आहे. त्याबद्दल अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचे व राजकुमार कदम यांचे मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक मा.श्री.पी.एस.घाडगे, व्ही.जी.पवार, अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव,उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,गुट्टे एस.जी.,कोषाध्यक्ष औताडे ए.बी.,सहसचिव पवार टी.जी.,माळी एन.जी., श्रीमती रेखा सोळुंके, केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव, अशोक मस्कले, मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी.,कुरेशी ए.ए.,राठोड पी.आर.,सुर्यवंशी आर.एन.,कदम व्ही.जी.,कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी.,सोळंके एन.टी.,वऱ्हाड बी.ए., तिर्थकर एस.एस.जमादार एफ.बी.पाटील पी.एस.यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, व्यकंटराव चिलवरवार, बसवेश्वर माने,शेरखाने जे.एस., रमेश आंधळे, यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके,हाळदे के.एम., जिल्हासचिव गणेश आजबे, रविंद्र वाकोडे, भाई चंद्रकांत चव्हाण, माने जी.व्ही., विक्रम मायाचारी,संजय येळवंते, कदम एन.टी.,ढेंगळे व्ही.एस., दिनेश पाटील व बीडचे माजी जिल्हाध्यक्ष डी.जी.तांदळे यांनी अभिनंदन केले आहे. ***



**परळी वैजनाथ:- राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने येथे शुक्रवार (दि.१३) पासून तीन दिवस चालणाऱ्या राज्यस्तरीय 'महा पशुधन एक्सपो' या पशु प्रदर्शनाला सुरूवात झाली आहे. शनिवारी (दि.१४) दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रदर्शनाला भेट दिली. परळी शहरातील उर्जानगर वसाहतीच्या मैदानावरील हेलिपॅडवर पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय मुंडे यांनी श्री फडणवीस यांचे स्वागत केले. आ.धनंजय मुंडे यांनी या स्वागतावेळी मुख्यमंत्र्यांना पुष्पगुच्छ व 'श्री ज्योतिर्लिंग क्षेत्र परळी स्थलकथा महात्म्य' हा ग्रंथ भेट दिला. हा ग्रंथ परळीतील ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक लक्ष्मण वाकडे यांनी लिहिलेला आहे. सुधांशू प्रकाशन या संस्थेने हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.**



**परळी वैजनाथ:- येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या रविवारी (दि.१५) महाशिवरात्रीनिमित्त भरणाऱ्या यात्रा महोत्सवाची तयारी पूर्ण झाली. दर्शनाला येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मंदिराच्या उत्तरघाटावरील पायऱ्यावर दर्शन मंडप टाकण्यात आला आहे. यामुळे भाविकांची सोय झाली आहे.**

# थर्मल वसाहतीत शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील उर्जानगर वसाहतीतील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने वसाहतीतील दवाखान्यात येत्या बुधवारी (दि.१८) सकाळी दहा वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरात नागरिकांनी तसेच समितीच्या सदस्यांनी सहभागी होवून रक्तदान करावे असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

शिवजयंतीदिनी गुरूवारी (दि.१९) वसाहतीतील क्लब बिल्डींग येथे सकाळी नउ वाजता ध्वजारोहण होणार आहे. सायंकाळी साडे सहा वाजता आनंदी जाधव यांचे छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन आणि कार्य या विषयावर व्याख्यान होणार आहे. व्याख्यानानंतर कोल्हापूर येथील सह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने शिवकालिन प्रात्यक्षिक हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान, या कार्यक्रमास वीज केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, उपमुख्य अभियंता महेश महाजन, हिंम्मतराव अवचार, उत्सव समितीचे अध्यक्ष भीमराव सिरसट, स्वागताध्यक्ष अंकुश जाधव यांच्यासह आर.पी.रेड्डी, एस.एन.बुक्तारे, पी.बी.गरूड, डी.डी.कोकाटे, पी.व्ही.गोसावी, व्ही.व्ही.सर्वज्ञ, एस.ए.सन्नाके, व्ही.जी.ताटे, अरविंद येरणे, बी.आर.आंबाड, शरद राठोड, ईश्वर सोनवणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले. ***